# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १२३१/२०२२**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** |
| अधिवक्ता श्री. अनिल रामचरण शाहू, नन्नुमल बिल्डींग समोर, बजेरीया, नागपूर-४४००१८ | वरिष्ठ लिपीक, नगर भुमापन अधिकारी क्र. ३, नागपूर | नगर भुमापन अधिकारी क्र. ३, नागपूर |

**सुनावणी दिनांक :- १२/११/२०२४**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **अनुपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** | **अनुपस्थित** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : ०६.०५.२०२२

(२) द्वितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०६.०५.२०२२

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी व संकलन अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमाचे उल्लघंन केल्याबाबत.

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती अधिकार अधिनियमाचे उल्लघंन केल्यामुळे त्यांचेवर शिस्त भंगाची कार्यवाही करण्यात यावी.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २३.०९.२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०३.०२.२०२२.

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : उपलब्ध नाही.

(४) **जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :** मौजा सोनगांव येथील नगर भुमापन क्रमांक १७९ या मालमत्ता पत्रकावर दिनांक २३.०३.२००० रोजी घेण्यात आलेल्या फेराफार क्रमांक १९३१ चे संपूर्ण प्रकरण स्वच्छ प्रतित पानांकनासह माहितीस उपलब्ध करुन देण्यात यावी, याबाबत माहिती मागितलेली आहे.

(५) **जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

**४. प्रथम अपील —**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०९.११.२०२१

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : उपलब्ध नाही.

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : मागणी केलेली माहिती अप्राप्त असल्यामुळे.

(४) **अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी सुचना जारी केल्या मात्र प्रत्यक्षात कोणतीही सुनावणी घेतल्याचे कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा —**

१) अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतीसाद दिल्याचे कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही.

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारित केलेले नाही.

**निष्कर्ष** — सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

१) अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे त्यांचेकडून कलम २० अन्वये खुलासा मागणे क्रमप्राप्त ठरते.

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून आदेश पारित केल्याचे दिसुन येत नाही.

सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, नगर भुमापन अधिकारी क्र. ३, नागपूर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २३.०९.२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहिती संदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखीलअपिलार्थी यांना पाठवावे.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, नगर भुमापन अधिकारी क्र. ३, नागपूर यांचे विरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगास दिनांक ०९.०१.२०२५ रोजी



माहिती आयोग खंडपीठ

व्यक्तीश: उपस्थित राहून सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) सदर प्रकरणी आयोगास कोणतीही पुर्वसुचना न देता अथवा पुर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र. (२२२/१५) सहा. मंत्रालय मुंबई, दिनांक ०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही का करण्यात येवू नये? याचाही खुलासा विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास दिनांक २९.०२.२०२५ रोजी व्यक्तीश: उपस्थित राहून सादर करावा.

४) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना आदेशाची प्रत मिळेल याची खातरजमा विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी घ्यावी.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
नागपूर

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १२.११.२०२४**

जावक क्रमांक ---४१--------- दिनांक ---07 JAN 2024---